# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०८/२०२५ ( बुधवार )**

---

## सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा होणार त्रास आणि त्या संदर्भात उपाययोजना सदंर्भात मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, यांनी घेतली बैठक

आज दिनांक २०/०८/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण ,पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा होणार त्रास आणि त्या संदर्भात उपाययोजना करण्याबाबत नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व १४ नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी/प्रतिनिधी, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांची बैठक घेतली. सदर बैठकीत मा. पोलीस अधिक्षक यांनी नगरपरिषद/नगरपंचायत यांच्या मार्फतीने मोकाट कुत्र्यांचे अ‍ॅन्टी रेबीज लसीकरण करण्याबाबत मोहीम राबविणे. मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण (नसबंदी) करणे, मोकाट कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठी प्रत्येक नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीत निश्चित जागा ठरविणे व त्याबाबत नियमावली तयार करणे, कुत्रे पाळण्याबाबत परवाना अत्यावश्यक करणे तसेच त्याबाबत नियमावली तयार करणे. आणि मोकाट कुत्र्यांबाबत हेल्प लाईन क्रमांक/संपर्क क्रमांक तयार करून त्याबाबत अधिकाधिक प्रसिध्दी देण्यासाठी बॅनर लावणे. वरील सर्व मुद्दयांवर सविस्तर चर्चा करून निर्देश देण्यात आले. तसेच संबधितांना अंमलबजावणी करीता महाराष्ट्र पोलीस कायदयाच्या तरतुदीन्वये कायदेशीर आदेश काढण्यात येईल.


पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण

# गोंडखैरी येथे अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू काढणारे, विक्री करणारे आणि कच्चा माल पुरवाणाऱ्यां आरोपीतांवर १९ गुन्हे नोंद, आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील कलम ११२ किरकोळ संघटीत गुन्हेगारी च्या कलमान्वये कारवाई

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक १९/०८/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर , पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्या सह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार, पोलीस स्टेशन कळमेश्वर चे अधिकारी आणि अंमलदार तसेच दंगा नियंत्रण पथकाचे अंमलदार अशा संयुक्त पथकाने मौजा गोंडखैरी येथे अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू तयार करणाऱ्या भट्टयांवर छापा टाकला. आरोपी नामे १) देविदास पिरमदास पवार, वय ४७ वर्ष, रा. गोडखैरी ,२) पापा जितुलाल भोसले,रा. गोडखैरी, ३) गणेश कन्हैया पवार, रा. गोडखैरी , ४) पुरूषोत्तम कन्हैया पवार, रा. गोडखैरी, ५) श्याम कन्हैया पवार, रा. गोडखैरी ६) रघुवीर पुरूषोत्तम मारवाडी, ७) प्रदीप प्रतापराव भोसले, रा. गोडखैरी आणि १८ महीला आरोपीतांवर कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा सह कलम ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हे १९ नोंद करण्यात आले आहे. **नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १५,७१५ लिटर मोहाफुल सडवा, १३०० लिटर मोहाफुल दारू तसेच इतर सहीत्य असा एकुण किंमती ७,२०,९५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**सदर गुन्हयांमध्ये अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू काढणारे, विक्री करणारे आरोपी आणि कच्चा माल पुरवणारे आरोपी हे संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात कळमेश्वर पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटीत गुन्हेगारी) हे कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या कडे सादर केला आहे.**



# अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू काढणाऱ्या आरोपीतांवर ११ गुन्हे नोंद
# ४ लाख ८७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २०/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखे चे पथक आणि पोलीस सटेशन जलालखेडा येथील अधिकारी अंमलदार यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील मौजा उमठा पारधी बेडा परिसरात अवैधरीत्या मोहफुल गावठी दारू तयार करणाऱ्या भट्टी वर छापा टाकुन आरोपीतांवर कलम ६५ ई महाराष्ट्र दारूबंदी कायदया अन्वये गुन्हे ५ नोंद करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन ९,८०० लिटर मोहाफुल सडवा, १७० लिटर मोहापुल दारू तसेच इतर सहीत्य असा एकुण किंमती २,१४,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २०/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांनी पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील मौजा डोंगरगाव पारधी बेडा परिसरात अवैधरीत्या मोहफुल गावठी दारू तयार करणाऱ्या भट्टी वर छापा टाकुन आरोपीतांवर कलम ६५ ई महाराष्ट्र दारूबंदी कायदया अन्वये गुन्हे ६ नोंद करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन ५,८०० लिटर मोहाफुल सडवा, ३६० लिटर मोहापुल दारू तसेच इतर सहीत्य असा एकुण किंमती २,७३,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**वर नमुद दोन्ही कारवाईत एकुण ४,८७,५००/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

## मोटर सायकल चोरीचे २ गुन्हे उघड , २ मोटर सायकल जप्त आरोपी अटक, नरखेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन नरखेड येथे दाखल अप क्रं २४५/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. आणि अप. क्र. ३४८/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या. सं. या मोटर सायकल चोरीच्या गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण पथक , नरखेड पोलीसांनी कसुन तपास करीत दिनांक १९/०८/२०२५ रोजी गुप्तबातमीदार तसेच तांत्रिक पुराव्याच्या अधारे आरोपी नामे १) बलवीरसींह राजेशसिंह जुनी, वय २३ वर्ष, रा. शास्त्री वार्ड, कबाडी मोहल्ला,पांढुर्ना ता. जि. पांढुर्ना (म.प्र.) याला ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयासंबधाने कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने गोधनी रोडवरून अप क्रं २४५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. मधील एक ड्रीम योगा मो. सा. क्र. एम.एच. ४९ ए. एक्स. ०८३८ ही मोटर सायकल चोरून नेल्याचे कबुली दिल्याने तसेच अप. क्र. ३४८/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. गुन्हयातील एक काळ्या रंगाची फँशन प्रो कंपनीची मो.सा. क्र. एम.एच. ४० सि.यु. २१९४ ही चोरून नेल्याची कबुली दिली. नमुद आरोपीला अटक करण्यात आली असुन आरोपीच्या ताब्यातुन एक ड्रीम योगा मो. सा. क्र. एम.एच. ४९ ए. एक्स. ०८३८ किमती २५,०००/— रूपये ची आणि एक काळ्या रंगाची फँशन प्रो कंपनीची मो. सा. क्र. एम.एच. ४० सि.यु. २१९४ किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ७०,००० /— रूपयांचा जप्त करण्यात आला आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १९/०८/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांना गुप्त बातमीदाने माहीती दिली की, पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये मध्यप्रदेश राज्यतुन नागपुर कडे सावनेर मार्गे प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखुची अवैध रित्या वाहतुक केली जाणार आहे. सदर माहीती मिळताच श्री सागर खर्डे यांनी केळवद पोलीस यांना नाकाबंदी करण्याचे आदेश दिल्याने. नमुद आदेशान्वये केळवद

पोलीसांनी रामपुरी फाटा येथे नाकाबंदी केली असता छिंदवाडा कडुन नागपुर कडे पांढऱ्या रंगाची कार येताना दिसली. पोलीसांनी सदर वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालक आरोपी हा पोलीसांना पाहुन गाडीतुन उतरून अंधराचा फायदा घेवुन पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. पोलीसांनी पंचासमक्ष १) सुगंधित जनम ५३५ तबांखु चे ५०० ग्रॅम क्षमतेचे एकुण २२ कंपनी बंद पॅकेट किंमती २२,०००/—रूपये ,२) इगल सुगंधीत तंबखु चे ४०० ग्रॅम क्षमतेचे एकुण ११ कंपनी बंद पॅकेट किंमती १८,७००/—रूपये आणि ३) चारचाकी वाहन स्विफ्ट डिझायर क्रमांक एम.एच ३१ एफ.सी. २४४१ किंमती ६,००,०००/— रूपये असा एकुण ६,४०,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद वाहन स्विफ्ट डिझायर क्रमांक एम.एच ३१ एफ. सी. २४४१ चा चालक व मालक आरोपी विरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

## नगपुर जिल्हयातुन पोलीस स्टेशन सावनेर येथील रेकॉर्डवरील आरोपी अमर बंडुजी सराटे याला केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी अमर बंडुजी सराटे ,वय २२ वर्षे, आजनी शेरडी ,ता. सावनेर ,जि नागपुर याला हद्दपार केले.**

नमुद आरोपीवर पोलीस स्टेशन सावनेर येथे शारिरीक दुखापातीचे तसेच चोरीचे गुन्हे दाखल असुन त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे.परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायद

व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीस स्टेशन सावनेर कडुन उपविभागिय दंडाधिकारी सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून आरोपी नामे अमर बंडुजी सराटे ,वय २२ वर्षे, आजनी शेरडी ,ता. सावनेर ,जि नागपुर याला १ महीन्या करीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केले आहे.



**अमर बंडुजी सराटे**

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १९/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २०/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत कळमेश्वर टाउन, झोपडपट्टी, एम.आय.डी.सी., सेलु आणि येरला येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री सागर खर्डे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच ब्राम्हणी फाटा, तळयाचे पार आणि बाजार चौक कळमेश्वर येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये कळमेश्वर पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अधिकारी अंमलदार हजर होते. तसेच पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत नाकाबंदी दरम्यान प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु बाबत कारवाई करण्यात आली आहे.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने